मिश्का

विक्टर एम्ब्रस



मिश्का जेव्हा आठ वर्षाचा होता तेव्हा त्याच्या आजोबांनी त्याच्यासाठी एक सारंगी तयार केली. लवकरच मिश्का सारंगीवर 'द ब्लू डेन्यूब' ची धुन एवढी चांगली वाजवू लागला. त्यांनंतर तो आपल्या भाग्याच्या शोधात बाहेर पडला.

मिश्काने एका सर्कशीमध्ये नोकरीसाठी चौकशी केली. पण शो मध्ये एका सारंगीवादक ठेवण्याच्या विचारावर सगळेजण हसले. तरीही, रिंगमास्टरने मिश्काला छोटे-मोठे काम करणाऱ्या मदतनिसाच्या रुपात ठेवून घेतले खरेतर मिश्क ट्रम्पवर चांगला नव्हता आणि घोडेस्वारीत तर फारच वाईट होता, पण एक दिवस मिश्काला जगासमोर सारंगी वाजवण्याची संधी मिळाली.


मिश्का

विक्टर एम्ब्रस

मराठी: अश्विनी बर्वे



मिश्का जेव्हा आठ वर्षाचा होता तेव्हा त्याच्या आजोबांनी त्याच्यासाठी एक सारंगी तयार केली. आणि त्याला 'द ब्लू डेन्यूब' गीत वाजवण्यास शिकवले.




मिश्काने दोन बकऱ्या, तीन कोंबड्या आणि चार बद्कांसाठी ते गाणे वाजवले, पण लवकरच तो इतक्या कमी प्रेक्षकांना उबला आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी तो आपल्या घराच्या बाहेर पडला.




तो फार लांब गेला नाही तोच त्याला एक सर्कस दिसली, तो हॉफमेन्स सर्कस मध्ये गेला. “मला निश्चितपणे इथे प्रसिद्धी मिळू शकेल.” मिश्काने विचार केला आणि मग तो आत गेला.

मिश्का, रिंगमास्टर कडे गेला आणि त्याने विचारले की “तुम्हांला तुमच्या कार्यक्रमात 'द ब्लू डेन्यूब' ची धून वाजवणाऱ्या सारंगी वादकाची गरज आहे?”.

मिश्काचे बोलणे ऐकून सर्कसमधील लोक हसू लागले, पण रिंगमास्टरने म्हटले की लहानमोठे काम करण्यासाठी एका मदतनिसाची गरज आहे.



“काही नाही तर हे चांगले आहे,” मिश्काने विचार केला आणि मग रिंगमास्टरने त्याला पहिले काम दिले, ते म्हणजे हत्तींच्या लीदची स्वच्छता करण्याचे.



जेव्हा हत्तींची घाण साफ झाली, तेव्हा रैवियोली ब्रदर्स यांनी त्याला ट्रेपेज़ वर उचलले, आणि सराव व्हावा म्हणून इकडेतिकडे फेकले.







त्यानंतर, त्याने कर्नल गॉलाश यांना मदत केली, जे आपल्या सिंहाचा सामना करू शकत नव्हते. सिंह कर्नलची वर्दी खेचत होता आणि त्यांचा मान राखत नव्हते.

मग मिश्काने सिंहासाठी 'द ब्लू डेन्यूब' ची धून वाजवली आणि त्यांना मोठ्या कौशल्याने शांत केले.







मग दोन घोडेस्वारांनी मिश्काला घोड्यावर चढवण्याचा प्रयत्न केला, पण मिश्काला तिथे आजाऱ्यासारखे वाटले. आणि त्याने त्यावरून लवकर उतरण्याचा प्रयत्न केला.



मग रिंगमास्टर, मिश्काला आपल्याबरोबर विदूषकांच्या मदतीसाठी घेऊन गेला. विदूषकांनी त्याच्या अंगावर पाणी फेकले- पण मिश्काला त्यांची ही मजा आवडली नाही.

रनिंग वॉटर, नावाच्या इंडियनने लक्ष्यावर चाकू फेकण्याच्या अभ्यासासाठी मिश्काचा उपयोग केला. पण मिश्काची उंची त्यासाठी कमी होती. मग मिश्काला अस्वलाला आंघोळ घालण्याचे आणि समुद्री सिंहाला मासे खाऊ घालण्याचे काम करायचे होते.

मिश्काला वाटले की तो या छोट्या – मोठ्या कामांनी कधी प्रसिद्ध होणार नाही.

मग, एक दिवस, हत्तीला ट्रेनिंग देणाऱ्या माणसाला सर्दी झाली आणि मिश्काला त्याची जागा घेण्यास सांगितले.










मिश्काने, मिस्टर हॉफमैनच्या सगळ्यात मोठ्या हत्तीला बाहेर आणले. तो हत्तीच्या डोक्यावर चढून उलटा उभा राहिला.आणि त्याने आपली सारंगीवर 'द ब्लू डेन्यूब' चे गीत वाजवले.

मिश्काचे ऐकून लोक वेडे झाले. त्यांनी त्याचा जय-जयकार केला आणि जोरदार टाळ्या वाजवल्या, तेव्हा रिंगमास्टर एका कोपऱ्यात उभा राहून ओरडत होता.




जसा मिश्का सर्कसचा स्टार झाला, तसे लोक हत्तीच्या डोक्यावर चढून त्याने वाजवलेली 'द ब्लू डेन्यूब' गीत ऐकण्यास उत्सुक असत.



मिस्टर हॉफमैन तिकीट विकून-विकून थकून गेले. त्यांनी एवढा पैसा मिळवला की त्यांनी अजून एक मोठा हत्ती खरेदी करण्याचे ठरवले.

आता मिश्का खूप व्यग्र होता आणि आपल्या संगीतासाठी तो खूप प्रसिद्ध झाला होता. म्हणून रिंगमास्टरला स्वतःला हत्तींना स्वच्छ करण्याचे काम करावे लागले.



"कोणाला तरी ते करावेच लागणार होते." मिश्का म्हणाला. आणि त्यानंतर तो नवीन गीत, 'रेडेट्स्की मार्च' चा अभ्यास करू लागला.